दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक १९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.२० एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# अंगारकी चतुर्थी निमित्त महागणपती चरणी भक्त झाले नतमस्तक

**दै.रायगड नगरी । उरण**

**हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या चिरनेर गावातील श्री महागणपती चरणी नतमस्तक होण्याचा योग भाविकांसाठी मंगळवारी ( दि१९) आलेल्या अंगारकी चतुर्थी निमित्ताने जुळून आला. त्यामुळे श्री महागणपती चिरनेर चरणी नतमस्तक होण्यासाठी नवीमुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, पनवेल, पेण व उरण येथील अनेक भक्तांनी आप आपल्या कुटुंबासह मंदिरात श्रीच्या दर्शनासाठी गर्दी केल्याचे चित्र पहावयास मिळत होते. यावेळी मंदिर परिसराला जत्रा- उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले होते.**



उरण तालुक्यातील चिरनेर या गावावर निसर्ग देवतेची अविरत कृपा आहे.या गावातील जन-तेने १९३० साली ब्रिटिश सरकार विरोधात सत्याग्रह पुकारुण देशाच्या स्वातंत्र्यासाठी गावकऱ्यांनी हुतात्म्ये पत्करले होते. गावात असणारे महागणपती देवस्थान चिरनेर गावचे ग्रामदैवत आहे. शिलाहार राजवटीत निर्मिलेले महागणपती मंदिर ततत्कालीन मुस्लिम आक्रमकांनी उध्वस्त केले मात्र तत्पूर्वी गणेशभक्तांनी महागणपतीची मूर्ती मंदिरा जवळील तलावात सुरक्षित लपवून ठेवली होती.

तद्नंतर पेशव्यांचे सरदार रामजी महादेव फडके यांना देवाने स्वप्नात येऊन मला तलावातून बाहेर काढ असे सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी तलावाचे खोदकाम करून मूर्ती बाहेर काढली. आणि नविन पाषाणी भव्य मंदिरात मूर्तीची प्रतिष्ठापना केली. महागणपतीचे मंदिर पाषाणी, गोल घुमटाचे असून पूर्वाभिमुख आहे. मंदिरात स्थानापन्न असलेली महा-गणपतीची मूर्ती भव्य, चतुर्भुज, शेंदूर चर्चित असून पद्मासनात बसलेली आहे. मूर्तीच्या हाती खड्ग व पाश आहेत. मूर्ती सुमारे सहा फूट उंच व साडेतीन फूट रुंद आहे.

नवसाला पावणारा गणपती म्हणून चिरनेर गा-वातील महागणपतीची ख्याती सर्वदूर पसरली आहे. या गणेशाच्या दर्शनाला व हुतात्म्यांच्या बलिदानातून पावन झालेल्या भूमीचे दर्शन घेण्यासाठी नेहमीच भाविकांची व पर्यटकांची गर्दी असते, अशा लाडक्या श्रींच्या चरणी नतमस्तक होण्याच भाग्य भाविकांना मंगळवार दि१९ एप्रिल २०२२ रोजी आलेल्या अंगारकी चतुर्थी निमित्ताने जुळून आला. त्यामुळे उरण,पनवेल प्रमाणे नवी मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवली, पेण मधिल भाविकांनी श्री गणेशाच्या मंदिरात दर्शनार्थ पहाटेच्या सुमारास ये- जा करत होते, यावेळी मंदिरात श्रीचे अभिषेक, सकाळी काकड आरती, भजन आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी भक्तगन भावनिक वातावरणात तलीन झाले होते. येणाऱ्या भाविकाना श्रीचे दर्शन सुलभ घेता यावे यासाठी मंदिर कमिटीचे ट्रस्टी संतोष ठाकूर, पदाधिकारी, ग्रामस्थ हिरीरीने सहभाग घेत होते. त्यामुळे अनेक भाविकांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसत होती.

# पनवेल महापालिकेच्या उपायुक्तपदी कल्पिता किशोर पिंपळे



**दै.रायगड नगरी । पनवेल**

ठाण्याच्या सहाय्यक आयुक्त कल्पिता किशोर पिंपळे यांची पनवेल महापालिकेच्या उपायुक्तपदी नियुक्ती झाली असून, आज (मंगळवार दि.१९ एप्रिल) आयुक्त गणेश देशमुख यांनी त्यांचे महापालिकेत स्वागत केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रसाळ, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार आदी उपस्थित होते.

कल्पिता किशोर पिंपळे यांनी यापूर्वी सर्वप्रथम २०१० ते ऑगस्ट २०१४ यादरम्यान अलिबाग नगरपालिकेच्या मुख्याधिकारी पदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. त्यानंतर ऑगस्ट २०१४ ते जून २०१७ यादरम्यान मिरा-भाईंदर महापालिकेच्या सहाय्यक आयुक्तपदी त्यांनी जबाबदारी सांभाळली.

त्यानंतर जुलै २०१७ ते डिसेंबर २०२० यादरम्यान नगरपरिषद प्रशासन संचालनालय सहाय्यक संचालक पदाची जबाबदारी सांभाळल्यानंतर २३ डिसेंबर २०२० ते १८ एप्रिल २०२२ या दरम्यान ठाणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त पदाची जबाबदारी त्यांनी अत्यंत कर्तव्यदक्षतेने आणि निर्भीडपणे निभावली.

# अल्पवयीन मुलीच्या लैंगिक अत्याचार प्रकरणी १० युवक कर्जत पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील गौरकामत येथील अल्पवयीन मुलीवर लैगिक अत्याचार प्रकरणी तालुक्यातील १० युवकांना कर्जत पोलीसांनी ताब्यात घेतले आहे, या युवकांना पनवेल येथील विशेष सत्र न्यायालयात हजर केले असता त्यांना ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

गौरकामत येथील अल्पवयीन मुलीचे इन्ट्राग्राम खात्यावरील अश्लील मेसेज, व्हिडिओ कॉलचे स्क्रीन शॉर्ट, स्क्रीन रेकॉर्डिंग करून हे एकमेकांना शेअर केल्या प्रकरणी त्या पीडित मुलीने काल दि.१८ एप्रिल रोजी कर्जत पोलीस ठाण्यात तरुणांना विरुद्ध तक्रार दाखल केली आहे

कर्जत पोलीस ठाण्यात कॉ गुन्हा रजि नंबर ११५/२०२२ भा. द.वि. कलम ३७६ (डी), (अ), ३५४ डी.बालकांचे लैगिक आपरांधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,८,१३,१४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००४ चे कलम ६६, ६७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

या प्रकरणी कर्जत पोलिसांनी गौरकामत मधील आठ तर शिरसे, व जांभिवली मधील प्रत्येकी एक अश्या १० युवकांना ताब्यात घेतले असून त्यांना आज दि.१९ एप्रिल रोजी पनवेल येथील विशेष सत्र न्यायालयात हजर केले असता त्यांना २५ एप्रिल पर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की करीत आहेत.

## संक्षिप्त...

### सदावर्तेंच्या घरात सापडलं नोटा मोजण्याचं मशीन, रजिस्टर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या घरावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी अटकेत असलेले वकील गुणरत्न सदावर्तेंच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. सदावर्तेंची चौकशी करण्यासाठी पोलीस कोठडी वाढवून देण्याची मागणी सरकारी वकील प्रदीप घरत यांनी न्यायालयाकडे केली आहे. सदावर्तेंच्या घरात काय काय सापडलं, याची संपूर्ण माहिती घरत यांनी न्यायाधीशांना दिली. सदावर्तेंच्या घरात पोलिसांना नोटा मोजण्याची मशीन आढळून आल्याची माहिती घरत यांनी न्यायमूर्तींना दिली. सदावर्तेंच्या घरात काही संशयास्पद कागदपत्रं सापडली आहेत. रजिस्टरमध्ये एसटी कर्मचाऱ्यांकडून पैसे गोळा केल्याचा उल्लेख आहे. याचा तपास होण्याची गरज आहे. त्यासाठी सदावर्तेंची चौकशी व्हायला हवी. त्यामुळे त्यांची कोठडी वाढवून देण्याची विनंती घरत यांनी न्यायालयाकडे केली. घरत यांनी न्यायालयात दिलेल्या नव्या माहितीमुळे सदावर्तेंच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. एसटी कर्मचाऱ्यांकडून पैसे गोळा केल्याचा उल्लेख सदावर्तेंच्या घरात सापडलेल्या रजिस्टरमध्ये आहे. भायखळा, परळ परिसरात सदावर्तेंच्या मालमत्ता आ-हेत. त्यांच्याकडे कारदेखील आहे. या मालमत्तांची खरेदी एसटी कर्मचाऱ्यांनी दिलेल्या पैशांमधून झाली का, याचा तपास पोलिसांकडून केला जाण्याची दाट शक्यता आहे.

**पाहिजेत**

**मराठी, इंग्रजी टायपिंगचे तसेच इंटरनेट ज्ञान असलेले मुले-मुली पाहिजेत.**

**: संपर्क :**
**९७६९०११६६७**

# तळोजा येथील मुस्लिम बांधवांसाठी कब्रस्तान हस्तांतरित करून दफन विधी खुली करण्यासाठी मंजूरी

## विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या मागणीला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल महापालिकेची सर्वसाधारण सभा १९ एप्रिल रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडली. या सभेत विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर यानी मागणी केलेल्या तळोजा येथील मुस्लिम बांधवांसाठी कब्रस्तान हस्तांतरित करून दफन विधी खुली करण्यासाठी मंजूरी मिळाली. तसेच अग्निशमन दलासाठी १५ कोटी रुपयांची वाहन खरेदी करण्यासाठी मंजूरी मिळाली आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तळोजा फेस १, सेक्टर १५ येथील भूखंड क्रमांक आठ/ नऊ येथे सिडको प्राधिकरणामार्फत सुसज्ज दफनभूमी तयार करण्यात आली आहे. पालिकेने सिडकोसोबत हस्तांतरणाची कार्यवाही केली नसल्याने कब्रस्तान दफन विधी करता खुले करण्यात आले नाही. त्यामुळे परिसरातील मुस्लिम समाज बांधवांना दफन विधी करता पनवेल, खारघर , मुंबई येथे जावे लागते त्यामुळे कुटुंबीयांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. तळ-ोजा येथील मुस्लिम बांधवांसाठी कब्रस्तान हस्तांतरित करून दफन विधी खुली करण्यासाठीची मागणी महाविकास आघाडी आणि विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर, नगरसेवक सतीश पाटील यानी केली होती. या मागणीला

.../२

> बऱ्याच वर्षांपासून रखडलेला प्रश्न तळोजा येथील मुस्लिम बांधवांच्या एकजुटीने आणि पाठपुराव्याने आज मार्गी लागला आहे.
> **प्रितम म्हात्रे, विरोधी पक्षनेते, पनवेल पालिका**

> दफ़नभूमित पालिकेचे कर्मचारी नेमणे गरजेचे आहे. विषय मार्गी लागल्याबद्दल आयुक्त, प्रशासन यांचे आभार मानते.
> **डॉ सुरेखा मोहोकर, नगरसेविका**

# महागडया मोटार सायकल चोरी करणारे सराईत गुन्हेगार पनवेल शहर पोलिसांकडून जेरबंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातून मोटारसायकल सह इतर वाहने चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी गजाआड करून त्याच्या कडून एकुण- ९,००,०००/- रू. कि. मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

समीर ज्ञानेश्वर पाटील, वय २६ वर्षे, रा. मु. पो. कोल्ही कोपर, ता. पनवेल, यांनी त्यांची ५०,०००/- रुपये किंमतीची यामाहा कंपनीची ठ१५ मॉडेलची मोटार सायकल कमांक एम. एच. /४६/ बी.जे./ ९०७४ हि मु. पो. भंगारपाडा, घर नंबर १३४, ता. पनवेल, याठिकाणी पार्क करून ठेवली असत ती कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी करून नेली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तकारीवरून पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.



नमुद गुन्हयाचा तपास करत असतांना गुप्त बातमीदार तसेच तांत्रीक तपासाच्या मदतीने पनवेल शहर पोलीस ठाणे येथील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयातील आर-ोपी कौशल श्रीरंग पाटील, रा.ठि. मु. पाणदिवे, पो. कोपरोली, जि. रायगड यास पोलीस ठाण्यात आणुन त्याचेकडे कौशल्यपुर्ण व अचुकपणे गुन्हयासदर्भात चौकशी केली असता नमुद गुन्हयातील चोरीस गेलेली मोटार सायकल तसेच त्याचे चोरी केलेल्या इतर पाच मोटार सायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत. तसेच मोटार सायकल चोरी करण्याकरीता आरोपीने वापरलेला महिंद्रा कंपनीची टेम्पो हस्तगत करण्यात आला. तसेच आरोपीकडुन तीन

.../२

# चिंचवली शाळा क्रमांक ९ ची इमारत धोकादायक

## खोपोली नगर परिषदेचा कारभार म्हणजे 'दिव्याखाली अंधार'

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली नगर परिषदेची चिंचवली गावातील शाळा क्र. ९ च्या इमारतीची पार दैना झाली असून इमारत धोकादायक असल्याचे चित्र दिसून येत आहे. इमारतीच्या भिंतीना तडे गेले आहेत. खिडक्या तुटल्या आहेत. शाळेत रुजलेली झाडे, सेफ्टी टँकला झाकण नसल्याने विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात असल्याचे दिसून येत आहे.

यासोबतच शाळेत जाणाऱ्या जिन्याला मोठे तडे गेले असून स्वच्छतेचीही बिकट अवस्था असल्याचे दिसून येत आहे. विद्यार्थ्यांना बसण्यासाठी तुटके बेच, छतावरील पत्रे देखील गंजले असून अनेक ठिकाणी स्लॅबचे काँक्रीट कोसळून लोखंडी सळ्या दिसून येत आहेत. जीर्ण झालेल्या भिंती पावसामुळे पडून गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकरता येत नाही. शिक्षण विभागाने याची दखल घ्यावी,



अशी मागणी आम आदमी पार्टी खोपोली-खालापूरकडून केली जात आहे.

मराठी शाळेची अशी अवस्था असल्यानेच मराठी शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्यांची संख्या रोडावली आहे. परंतु ही पडझड जेव्हा सुरू झाली, तेव्हा या प्रश्नांकडे गंभीरपणे पाहिले गेले नाही. आजच्या घडीला तथाकथित पांढरपेशा आणि मध्यमवर्गातील पालक आपल्या मुलांना मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये घालत नाहीत. याचा परिणाम मराठी माध्यमांच्या शाळांवर होतो

.../२

# मोटारसायकलस्वार तरुणाचा अपघातात मृत्यू

## ट्रकचा चालक अपघातानंतर ट्रक सोडून फरार

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटामध्ये धामणदिवी गावाच्या हद्दीमध्ये मंगळवारी सकाळी पावण-सात वाजण्याच्या सुमारास अज्ञात चालकाने चुकीच्या बाजूने ओव्हरटेक करून समोरून येणाऱ्या मोटारसायकलस्वारास धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघातानंतर ट्रक घटनास्थळी सोडून चालक पसार झाला आहे.

रायगड जिल्ह्यातील पोलादपूर ते रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यांच्या सीमवर्ती भागात असलेल्या महामार्ग पोलीस केंद्र, कशेडीच्या हद्दीमध्ये मुंबई-गोवा महामार्ग क्रमांक ६६ वर धामणदेवी गावच्या हद्दीत घाटामध्ये आज मंगळवार दि.१९ एप्रिल२०२२ रोजी सकाळी पावणेसात वाजण्याच्या दरम्यान तळोजा ते लोटे जाणारा ट्रक क्रमांक एमएच ०४ डीके ७२५८ वरील अज्ञात चालकाने ओव्हरटेक करून रॉंग साईडला जाऊन समोरून पेढांबे चिपळूण ते मुंबइकडे मोटर



सायकल एमएच-०८-एव्ही-३७२६ घेऊन जाणारा मोटारसायकलस्वार अथर्व मोहन सावंत (वय-२५ वर्षे, रा.पेढांबे, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) यांच्या मोटर सायकलला जोरदार ठोकर देऊन अपघात केला. या अपघातामध्ये मोटार

.../२

# वसंतराव नाईक महाविद्यालय इतिहास विभागाची शैक्षणिक सहल संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅरिस्टर ए.आर. अंतुले विज्ञान महाविद्यालयाची इतिहास विभाग व हिस्टरी असोसिएशनद्वारे शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन सुप्रसिद्ध कुडा मांदाड लेणीचे ठिकाणी करण्यात आले होते.

सहलीत महाविद्यालयाच्या किशोरी वारे, अलिशा जाधव, पुजा भामरे, मिनाज काझी, धनवंती हांडे, अनिशा हांडे, अंजली साळवी,रोशनी नात्ती या विद्यार्थ्यां बरोबर इतिहास विभाग प्रमुख व हिस्टरी असोसिएशनचे चेअरमन प्रा.डॉ.एस.यू.बेंद्रे, हिस्टरी असोसिएशनचे सदस्य प्रा.आर.एस.माशाळे, कर्मचारी अखलाक मुकादम यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थी व प्राध्यापक वर्गाला अभ्यास सहलीत कुडा-मांदाड येथील इसवीसनाच्या दुसर्या व तिसऱ्या शतकात तयार करण्यात आलेल्या शैलकृत लेणी प्रकारातील एकूण सव्वीस लेणी असून दोन स्तरात विभागले गेले आहेत. खालच्या स्तरात एक ते पंधरा लेणी व उर्वरित अकरा लेणी वरच्या स्तरावर असल्याचे निदर्शनास आले.

एकूण पाच चैत्यगृह आणि अन्य सर्व विहार आहेत. भिंतीवर मिथुन शिल्पे, कमळ शिल्पे, बुध्द मुर्ती, नाग, चक्र आदी अलंकारण केले असून सहाव्या क्रमांकाचे चैत्यगृह सर्वात मोठा आहे. एका चैत्यगृहाच्या बाहेर गजशिल्प कोरलेले आहे. एकूण अकरा पाण्याच्या टाक्या आसून टाकीत बारा महिने थंडगार पाणी उपलब्ध असल्याचे प्रा. माशाळे यांनी माहिती देताना अशी लेणी राष्ट्रीय स्मारक म्हणून केंद्र सरकारने जतन केली आहे.

# विजय-विकास बंधू राज्यपाल यांच्या हस्ते राजभवनावर राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यात कोरोना महामारीच्या काळात केलेल्या समाज कार्याबद्दल शिवसेनेचे जिल्हापरिषद सदस्य विजय भोईर आणि ब्लू स्टार सिक्युरिटी अँड फॅसिलिटी सर्विसेसचे व्यवस्थापक विकास भोईर या जुळ्या भावांना राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होलकर राष्ट्रीय पुरस्कार २०२१ ने महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल भगतसिंग कोषारी यांच्या हस्ते राजमाता कल्पनाराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थित राज्य भवनावर सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारा बद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

उरण तालुक्यातील नवघर शिवसेनेचे जिल्हापरिषद सदस्य विजय भोईर आणि त्यांचे बंधू जुळे बंधू विकास भोईर यांनी सामाजिक कार्याचा वसा हाती घेतला आहे. हे कार्य फक्त उरण मध्येच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्यात सुरू आहे. त्यांनी अनेक गरजु आणि गरीब विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्य वाटप केले आहे. चिरनेर येथील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना कराटेच्या गणवेश सह मोफत शिक्षण दिले जात आहे.

कोरोनामध्ये गरजूंना अन्नधान्य वाटप तसेच अनेक भागात वाफारा मशीन वाटप केल्या आहेत .मोफत आरोग्य शिबीर रक्तदान शिबीर अशा प्रकारच्या शिबिरा मधून रुग्णांचे मोफत उपचार करण्यात आले आहे.कोरोनामध्ये पोलीस खात्याला पेट्रोलीग साठी स्वतःच्या गाड्या ही देण्यात आल्या होत्या अशा विविध सामाजिक कार्याची जाण लक्षात घेत त्यांना या सामाजिक कार्याबद्दल राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर राष्ट्रीय पुरस्कार २०२१ ने राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# रायगड प्रेस क्लबचा वर्धापन दिन २२ एप्रिल रोजी माणगांवात, मान्यवरांच्या हस्ते होणार पुरस्काराचे वितरण

**दै.रायगड नगरी । माणगाव**

रायगड प्रेस क्लबचा १६ वा वर्धापन दिन आणि पत्रकार सन्मान सोहळा माणगांव येथे कुणबी भवन या ठिकाणी २२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम रायगड प्रेस क्लबचे संस्थापक तसेच मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या सोहळ्यात राज्यस्तरीय युवा संपादक पुरस्कार आणि जिल्ह-ास्तरीय पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण केले जाणार आहे.

या रायगड प्रेस क्लबचे पुरस्कारांचे मानकरी अजित वरपे यांना आचार्य अत्रे राज्यस्तरीय युवा संपादक पुरस्कार, विजय मांडे जीवन गौरव पुरस्कार, मेघराज जाधव व उदयकुमार कळस स्व. निशिकांत उर्फ नानासाहेब जोशी जेष्ठ पत्रकार पुरस्कार, प्रफुल्ल पवार स्व.प्रकाश काटदरे स्मृती निर्भीड पत्रकार पुरस्कार, संजय (आपा ) ढवळे व चंद्रशेखर (बाबुशेठ )खानविलकर सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार, डॉ. इस्माईल रहाटविलकर आरोग्यसेवा पुरस्कार, संतोष वरपे, दीपक जाधव, डॉ. संजय सोनवणे यांना यशस्वी मराठी उद्योजक पुरस्कार, हरेश मोरे स्व. संतोष पवार स्मृती युवा पत्रकार पुरस्कार, सीमा मोरे सावित्रीबाई फुले महिला पत्रकारिता पुरस्कार, प्रकाश माळी व प्रसाद पाटील उत्कृष्ट छाया चित्रकार पुरस्कार,आनंद पवार, एस. टी. पाटील, संतोष शिलकर, नंदकुमार मरवडे यांना श्रमिक पुरस्कार देऊन मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी ना.आदिती तटकरे, खासदार सुनिल तटकरे, मा.प्रवीण दरेकर, आमदार भरत गोगावले, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, जेष्ठ माध्यमकर्मी समीरण वाळवेकर, मराठी पत्रकार परिषद विश्वस्त किरण नाईक, मराठी पत्रकार परिषद कार्याध्यक्ष शरद पाबळे, मिलिंद आष्टीकर कोकण विभाग मराठी पत्रकार परिषद सचिव विजय मोकल, रायगड प्रेस क्लब अध्यक्ष भारत रांजणकर, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यावेळी उपस्थित राहणार आहेत.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रायगड प्रेस क्लब जिल्हा कार्यकारिणी व माणगांव तालुका प्रेस क्लब कार्यकारिणी मेहनत घेत आहेत.

# अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरी प्रणित शाखा पनवेल तर्फे मोफत आरोग्य तपासणी तसेच नाडी परीक्षण शिबीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरी प्रणित शाखा पनवेल तर्फे हनुमान मंदिर, पोदी नं. ३, सेक्टर-१६ , नवीन पनवेल येथे श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताह सोहळ्याचे नियोजन २२ एप्रिल ते २८ एप्रिल या काळात केले आहे,

या काळात श्री गुरूचरित्र, भागवत, नवनाथ या ग्रंथाचे पारायण, प्रहर सेवा, नित्य विशेष याग, त्रिकाळ आरती तसेच विविध आध्यात्मिक सेवा पार पडतील, तसेच दिंडोरी प्रणित मार्गाच्या २०% अध्यात्म आणि ८०% समाजकारण या नुसार २४ एप्रिल रोजी रक्तदान शिबीर तसेच मंगळवार २६ एप्रिल रोजी सद्गुरू मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल अॅण्ड मेडिकल ट्रस्ट, त्र्यंबकेश्वर अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी तसेच नाडी परीक्षण आणि सर्व रोग निदान शिबीर सकाळी १० ते रात्री ८ या काळात आयोजित केले आहे.

तरी सर्व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या साठी संपर्क- ९९८७५७३४२ येथे साधावा.


अर्जदारतर्फे वकील : अनंत देवजी पाटील

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्याया. सो.रायगड यांचे कोर्टात
मो.अप.क्लेम. नं.७०/२०१८
नि.नं.१४/ड
ने.ता.२९/०४/२०२२

**गुलाब चांगू पवार वगैरे २** अर्जदार
विरुद्ध
१) संतोष बाबुराव मोहिते
२) दि न्यू इंडिया इश्युरन्स कं.लि. सामनेवाला
प्रति,
सामनेवाला नं. १) संतोष बाबुराव मोहिते
प्लॉट नं.३९/३४, गोखले हायस्कूल जवळ,
सेक्टर-१२, खारघर, पनवेल
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०३

दि.०५/०२/२०१८ रोजी पहाटे ०५:१५ वाजण्याच्या सुमारास मौजे पनवेल हद्दीत, जुना-मुंबई-पुणे हायवेवरील, पळस्पे फाट्याचे जवळ, टाटा मोटार सर्व्हीसच्या सेन्टरच्या समोर, पुणे लेनवर, पनवेल शहर पोलीस स्टेशन, नवी मुंबई, जि.रायगड यांचे हद्दीत सदरचा अपघात घडला. सदर अपघातामध्ये अर्जदार नं.१ यांचे पती, अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील चांगू धर्मा पवार हे मयत झालेले आहेत. सदर अपघातामध्ये ट्रेलर बॉडी क्र.एम. एच.४६/बी बी ३९९१ चालक हा मयत चांगू धर्मा पवार यांच्या मरणास कारणीभूत ठरला आहे. म्हणून सदर कारणाकरिता अर्जदार नुकसान भरपाई मिळविण्याकरिता अर्ज करीत आहेत. म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता रु.७,००,०००/- चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.२९/०४/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख ०६/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक जिल्हा न्याया, रायगड-अलिबाग | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक जिल्हा न्याया, रायगड-अलिबाग



मे.इंदलकर सो यांच्या कोर्टात

**अर्जदाराचे वकील**
**अॅड.मेहबुब गै. पटेल**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.४२८/२०२२
ने.ता.२६/०५/२०२२

**श्रीमती.हसीना जसीमुद्दीन शेख**
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.५२३, वडघर, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
**मा.आयुक्त सो./मा.निबंधक सो**
जन्म मृत्यू नोंदणी
पनवेल महानगरपालिका,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, **पै.जसीमुद्दीन सैजुद्दीन शेख** यांचा मृत्यू दि.३०/०६/२०२० रोजी मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील राहत्या घरी झालेला आहे.

वरील **पै.जसीमुद्दीन सैजुद्दीन शेख** यांचा मृत्यू दि.३०/०६/२०२० रोजी वडघर, ता.पनवेल येथे झाला आहे असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदाराने यांनी या मे.कोर्टात मृत्यू दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. **पै.जसीमुद्दीन सैजुद्दीन शेख** यांचे मृत्यूबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांना मृत्यूदाखला देण्याची ताबडतोब कार्यवाही करेल.

आज दि.१९/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेली मिळकत त्यांचे विद्यमान मालक **१) जावेद अहमद रफी उल हसन खान** यांचेकडून कायमस्वरुपी मिळकत घेण्याबाबत व्यवहार आमच्या अशिलांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस देण्याबाबत विद्यमान मालकांनी संमती दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | भूधारण पद्धती | क्षेत्र (हे.आर.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| २७६ | ६ | वर्ग-१ | ०-०५-६०<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण ०-०५-६० | ०.००.०० |

वर वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबे कब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकाने दिल्यावरुन आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे. सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधितांच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडेही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आणून द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आम्ही सदर व्यवहार पूर्ण करू व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

दिनांक : २०/०४/२०२२

**सही/-**
**अॅड.टी.एन.त्रिपाठी (हायकोर्ट)**
**ए विंग, अगरवाल ट्रेड सेंटर, ऑफिस नं.८५/८६, ८ वा मजला, प्लॉट नं.६२, सेक्टर ११, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**



मा.पांडे साहेब

**अॅड.शशिकांत आ. म्हात्रे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचे कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.४५१/२०२२
ने.ता.१३/०५/२०२२

**श्री.संजय गोविंद लबडे**
वय : ४६ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.खानावळे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत खानावळे
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांची काकी **कै.आनंदीबाई रामा उर्फ देहू लबडे** दि.०८/१२/१९९१ रोजी मु.खानावळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहे. वरील अर्जदार **श्री.संजय गोविंद लबडे** यांची काकी **कै.आनंदीबाई रामा उर्फ देहू लबडे** यांचे मृत्यू नोंदणी करण्यासाठी व मृत्यू दाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले आहे. तरी सदर अर्जाबाबत इतर कोणाचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीची कोणतीही हरकत न दाखविल्यास सदरहू अर्जदारांच्या मागणीनुसार मृत्यू नोंद होवून मृत्यू दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१९/०४/२०२२ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल


# निडी प्राथमिक शाळेत शाळा पूर्वतयारी मेळावा संपन्न

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

कोरोनाच्या जागतिक महामारीमुळे गेली दोन वर्षे अंगणवाडी भरु न शकल्याने चालू शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिलीमध्ये दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांना भविष्यात लेखन व वाचनाचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी विद्यार्थ्यांची शाळा पूर्वतयारी करून घेणे गरजेचे असल्याने या अनुषंगाने राजिप प्राथमिक शाळा निडी तर्फे नागोठणे येथे कोंडगाव ग्रामपंचायत माजी सरपंच विद्यमान सदस्य शेकापचे युवा नेते निखिल मढवी यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळा पूर्वतयारी मेळावा बुधवार दि. १८ एप्रिलला घेण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक संघ, शिक्षक-पालक संघ व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या ६ विद्यार्थ्यांची ढोल, लेझीम पथकाच्या वाद्यांनी गावातून मिरवणूक काढुन औक्षण करून खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी निखिल मढवी, ग्रामपंचायत सदस्या प्रणाली मढवी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वंदन तांबोळी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भगवान मढवी, कैलास मढवी, मोरेश्वर मढवी, रमेश मढवी, शाळेचे मुख्याध्यापक रुपेश पाटील, शिक्षिका संध्या मात्रे व ग्रामस्थ उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## तळोजा येथील मुस्लिम बांधवांसाठी कब्रस्तान हस्तांतरित करून दफन विधी खुली करण्यासाठी मंजूरी

सर्वसाधारण सभेत मंजूरी मिळाली आहे. तसेच अग्निशमन दलासाठी १५ कोटिंची वाहन खरेदी करण्यासाठी मंजूरी मिळाली आहे. एकूण ११० चौरस किलोमीटर इतके कार्यक्षेत्र असलेल्या पनवेल महानगरपालिका अग्निशामक विभागामार्फत नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे बचाव कार्य करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान असलेले फायरफाईटींग वाहने असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे मल्टीपर्पज फायर इंजिन, रॅपिड इंटर्वेंशन व्हीकल, मल्टीपर्पज टर्न टेबल लँडर, वॉटर टँकर ही पाच वाहने पनवेल पालिका खरेदी करणार आहे. नगरसेवक सतीश पाटील, डॉ सुरेखा मोहोकर यांच्यासह महाविकास आघाडीने विशेष प्रयत्न करून कब्रस्तान हस्तांतरित करण्यासाठी पाठपुरावा केला आहे. कब्रस्तान आणि अग्निशामक दलासाठी वाहन खरेदी करण्यासाठी मंजूरी मिळाल्याबाबत विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर, नगरसेवक सतीश पाटील आणि महाविकास आघाडीने आयुक्त गणेश देशमुख, प्रशासन यांचे आभार मानले आहेत.

कामोठे, खांदा कॉलनी, तळोजे, ग्रामीण भाग येथे फायर स्टेशन उभारणे. तसेच अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना जॅकीट, गंबूट, ग्लोज पुरवावेत, आणि खेडेगावात आग विझविण्यासाठी छोटे पिकअप खरेदी करुन विमा कवचाचे संरक्षण देणे अशी मागणी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी केली आहे.

## महागडया मोटार सायकल चोरी करणारे सराईत गुन्हेगार पनवेल शहर पोलिसांकडून जेरबंद

लाख रूपये कि.च्या तीन १५ मोटार सायकल एक लाख रूपये कि.ची बुलेट, एक लाख रूपये कि.च्या दोन मोपेड मोटार सायकल व चार लाख रूपये कि. चा टेम्पो, व असे एकुण - ९,००,०००/- रू. कि. मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

वरील कामगीरी . पोलीस आयुक्त बी. के. सिंग, . सह. पोलीस आयुक्त डॉ. जय जाधव, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-०२ पनवेल शिवराज पाटील,. सपोआ. भागवत सोनवणे, पनवेल विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाणे, विजय कादबाने, पोलीस निरीक्षक, (गुन्हे) संजय जोशी, व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक, गणेश दळवी, पोउपनि अभयसिंह शिंदे, पो.हवा अविनाश गंथडे, पो.हवा नितीन वाघमारे, पो.ना अशोक राठोड, पो ना महेश पाटील, पो.ना भगवान सांळुके, पो. शि संतोष मिसाळ यांनी केलेली आहे.

## चिंचवली शाळा क्रमांक ९ ची इमारत धोकादायक

आहे. मराठी शाळांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याने नागरिकांनी मराठी शाळांमधून पाठिंबा काढून घेतल्यामुळे ही बिकट अवस्था झाले असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.

मराठी माध्यमातून शिक्षणाचा स्तर चांगला होता आणि आजही चांगलाच आहे. आधी या शाळांमध्ये प्रत्येक इयत्तेच्या अनेक तुकड्यांमध्ये भरपूर विद्यार्थी असायचे. आता अनेक मराठी शाळांमध्ये दोन तुकड्या भरायची मारामार झाली आहे. तर, इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मात्र उलटे चित्र पाहायला मिळत आहे. परिसरात इंग्रजी शाळा नसेल, तर लांबच्या शाळेत प्रवेश घेऊ, पण शाळा इंग्रजी माध्यमाचीच असली पाहिजे, हा पालकांचा आता हट्ट मराठी शाळेचे भविष्य धोक्यात आणणारा आहे. अशा वेळी, मराठी मध्यमवर्गीय पालकांची शाळेच्या मुलाखतीत होणारी मानहानी, अपमान पचवूनही ते लाखो रुपयांची देणगी देऊन आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत घालतात. हे सर्व शहरातच चालले आहे. असे नाही ग्रामीण भागातही या इंग्रजी शाळांचे फैड मोठ्या प्रमाणात पाहायाल मिळत आहे. कारण खोपोली शहरातील अनेक मराठी शाळेची इमारती धोकादायक झाल्या असून शाळेत शाळांना बाहेरून रंगरंगोटी तर आतून बिकट अवस्था आहे, तरी लवकरात लवकर शाळांची अवस्था सुधारली नाही तर आम आदमी पार्टीच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## मोटार सायकलस्वार तरुणाचा अपघातात मृत्यू

सायकलस्वार अथर्व मोहन सावंत याचा जागीच मृत्यू झाला.

अपघातस्थळी पोलादपूर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी आले असून त्यांनी पंचनामा करून मृतदेह ग्रामीण रुग्णालय पोलादपूर या ठिकाणी पाठविला. अपघात झाल्यानंतर ट्रकचालक ट्रक अपघातस्थळी पळून गेला असून अपघातस्थळी एकेरी वाहतूक सुरळीत सुरू करण्यात आली. कशेडी टॅप पोलीस ठाण्याचे पीएसआय चांदणे यांनी याकामी तातडीने प्रयत्न केले.


## श्रीवर्धन नगरपरिषद, श्रीवर्धन
### रविंद्र नारायण राऊत प्रशासकीय भवन
### ता.श्रीवर्धन, जिल्हा : रायगड

(I.S.O. 9001 : 2015 प्रमाणित)

दूरध्वनी क्रमांक : ०२१४७-२२२३७८ ई-मेल : Shriwardhan.nagarparishad@gmail.com

क्र.श्रीनप/आवि/कात १०/फेरनिविदा जाहीर निविदा ०९/००२२/२०२१-२२ दिनांक : १९/०४/२०२२

### फेर निविदा
### (विद्युत विभाग) जाहीर निविदा सुचना क्र. /२०२२-२३

श्रीवर्धन नगरपरिषद इच्छुक ठेकेदार / पुरवठादार यांचेकडून इच्छुक ठेकेदारांकडून खालील कामांसाठी दोन लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागवित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | **श्रीवर्धन नगरपरिषद विद्युत विभागाकडील देखभाल दुरुस्ती कामाकरिता आवश्यक यंत्रणा पुरविणे. (द्वितीय फेरनिविदा)** | १०००/- | ७७४८/- | १ वर्षे |

अटी व शर्ती :-

१) विहित नमुन्यातील सर्व अटी व शर्तीसह निविदा पत्रे / फॉर्मची विक्री नगरपरिषद कार्यालय, श्रीवर्धन येथे कार्यालयीन वेळेत दिनांक २०/०४/२०२२ ते २६/०४/२०२२ पर्यंत कामकाजाचे दिवशी निविदा फॉर्म फी रक्कम नगरपरिषद कार्यालयात भरणा करून निविदा पत्रे / फॉर्म प्राप्त करून घेता येतील. २) विहित निविदा पत्रके वेगवेगळ्या दोन सिलबंद लखोट्यात दिनांक २०/०४/०२२ ते २६/०४/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालयात दाखल करता येतील. ४) प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २७/०४/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत श्रीवर्धन नगरपरिषदेच्या मा.मुख्याधिकारी यांच्या दालनात उघडण्यात येईल. ५) तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे निविदा फॉर्ममध्ये नमूद करण्यात आलेली आहेत. ६) उशिरा प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. ६) इसारा रकमेचा राष्ट्रीयीकृत बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) / बँकर्स चेक प्रत्येक कामाचे तांत्रिक बोलीचे लिफाफ्यामध्ये निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. (किंवा सदरची इसारा रक्कम नगरपरिषदेकडे भरणा करून त्याची पावती निविदेसोबत सादर करावी.) ८) सही नसलेली व अटी अगर शर्तींची निविदा स्वीकारली जाणार नाही. ९) निविदा सूचना व करारनामा हा निविदेचाच एक भाग असेल. १०) पुरवठा करण्यात येणारी साहित्य स्पेसिफिकेशनप्रमाणे मान्यताप्राप्त कंपन्यांचे पुरवठा करणे ठेकेदारास बंधनकारक राहील. ११) भाववाढीचे कलम कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही. १२) मंजूर झालेल्या ठेकेदारांची इसारा रक्कम ही सुरक्षा अनामत रक्कम म्हणून गृहीत धरण्यात येईल. सदर निविदेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर तीन महिन्यानंतर इसारा रक्कम परत केली जाईल. १३) निधीच्या उपलब्धतेनुसार कामाची देयके अदा करण्यात येतील. १४) कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारणे, नाकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचे अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवले आहेत. १५) नगरपरिषदेने ज्या ठेका कंपनींना अथवा त्यांचेशी संबंधित व्यक्तींना निविदा न देण्याचा निर्णय घेतला आहे, अशा ठेका कंपनींना व त्यांचेशी संबंधित व्यक्तींना नगरपरिषदेकडे प्राप्त निविदांमध्ये कोणत्याही ठेकेदाराचे प्रतिनिधीत्व करता येणार नाही.

**सही/-**
**(विराज आत्माराम लबडे)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**श्रीवर्धन नगरपरिषद**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कलाविष्कार तर्फे मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी समर कॅम्प

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लहान मुले ही मातीच्या गोळ्यासारखी असतात. आपण आकार देऊ तशी ती घडत जातात. मुलांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांच्या बाबतीतही हे लागू पडते. योग्य वयात त्यांची जोपासना झाली आणि योग्य प्रशिक्षण मिळालं तर निश्चितच या चिमुकल्यांमधून चांगले कलाकार निर्माण होऊ शकतात. शिवाय याद्वारे मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही साधता येतो, हे लक्षात घेऊन पनवेलमधील कलाविष्कार कॅडमी तर्फे लवकरच मुलांसाठी खास समर कॅम्प आयोजित केला जात आहे. ज्यामध्ये डान्स,क्टिंग,ड्राईंग व म्युझिक या विषयांचे अनुभवी तज्ञांद्वारा प्रशिक्षण दिले जाईल. मध्यंतरी कोरोना काळात सर्व उपक्रम थांबलेले असताना आता दीर्घ काळानंतर एक सकारात्मक विचार घेऊन मुलांना व त्यांच्या पालकांना प्रेरित करून सुट्टीच्या मोकळ्या वेळात मुलांना आपले छंद जोपासून त्यातून त्यांना अनोखा आनंदही मिळवता यावा याउद्देशाने या समर कँम्पचे आयोजन करीत असल्याचे कलाविष्कार कॅडमीच्या संचालिका आरजे रुपाली राणे यांनी सांगितले.हा कँम्प २२ मे ते २९ मे दरम्यान सकाळी ९ ते १२ या वेळेत सिनिअर सिटिझन हॉल नवीन पनवेल येथे होणार आहे.सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी ७०२१०३४७२८ / ९८१९६७५५४२ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

## मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

पनवेल हॉस्पिटल मल्टीस्पेशालिटी महात्मा फुले जन आरोग्य योजनेतंर्गत व कन्झुमर राईटस् आँर्गनाईजेशन महाराष्ट्र आणि ग्रा.पं.निडी ता.रोहा यांच्या वतीने रा.जि.प.प्राथ.शाळा निडी येथे गुरू.दि.२१ रोजी स.१० ते दु.२ या वेळेत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. या शिबिरात रक्तदाब तपासणी,५० वर्षावरील रूग्णांसाठी मोफत मधूमेह तपासणी, गरजू रूग्णांसाठी ईसीजी तपासणी, स्त्रीयांचे आरोग्य तपासणी, मुतखडा तपासणी, मुत्रपिंड, मुत्रमार्ग विकार, हाडांच्या शस्त्रक्रिया, न्युमोनिया, दमा व फुफ्फुसांचे आजार आदी आजारांबरोबर मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप आदींवर उपचार केले जाणार आहेत. या शिबिरात डॉ. सुरेश करांडे (एम.डी.), डॉ. आरती करांडे (बी.ए.एम.एस्), डॉ. फरीद चिमावकर आदी तज्ञ डॉक्टरांक़डून तपासणी करण्यात येऊन मार्गदर्शन मिळणार आहे.तर गरजू रूग्णांनी शिबिरात येताना पिवळे रेशनकार्ड, केशरी रेशनकार्ड कार्ड,आधारकार्ड किंवा मतदान कार्ड व जूने रिपोर्ट तसेच मोबाईल नं.आणणे आवश्यक आहे.

### जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, **१) श्री.रमेश परशुराम ठाकूर, २) श्री.चंद्रकांत परशुराम ठाकूर, ३) श्रीमती. गुलाब परशुराम ठाकूर, ४) सौ.हेमलता अनंता पाटील** रा.मुळेखंड तेलिपाडा, ता.उरण, जि.रायगड यांच्या सहमालकीची व ताबे कब्जातील खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत आहे.

**(मौजे : चाणजे, ता.उरण, जि.रायगड)**

| मौजे | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| चाणजे | १९० | २ | ०-२३-८० | ४.०६ |

सदर शेतजमीन ही **१) श्री.रमेश परशुराम ठाकूर, २) श्री.चंद्रकांत परशुराम ठाकूर, ३) श्रीमती.गुलाब परशुराम ठाकूर, ४) सौ.हेमलता अनंता पाटील** ह्यांनी आपली आर्थिक गरज भागविण्याकरिता **श्री.संदीप दिलीप थळे** यांस कायमस्वरुपी विक्री करण्याचे ठरविले आहे. सबब कोणतीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी कार्यालय यांचा सदर मिळकतीसंबंधी किंवा त्यावर किंवा त्याच्या भागावर, विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पृष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप याची माहिती अन्य तपशिलासह की जी पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुराव्याने (वकील) मारिया कोळी खालील सही करणार यांसकडे त्यांच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की सदरहू मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या बंधनापासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकत ही बोजारहीत आहे असे मानण्यात येईल.

दिनांक : १९/०४/२०२२

**सही/-**
**ॲड.मारिया कोळी**
**१ मजला, श्री प्रेरणा अर्पा.,**
**उरण, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.९७०२२०९११४**

**अर्जदाराचे वकील : श्री.सुनील एन. मोरे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.४६३/२०२२
ने.ता.२६/०५/२०२२

**श्री.धिरज यज्ञेश्वर पाटील**
वय : ४७ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.घर नं.५३० अे, मु.पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

मा.निबंधक,
विवाह जन्म मृत्यू नोंदणी विभाग,
नावडे विभाग, पनवेल महानगरपालिका
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार यांचा भाऊ **कै.नरेंद्र यज्ञेश्वर पाटील** यांचा मृत्यू दि.३०/०५/१९९१ रोजी मु.पो. नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मयत झालेली आहेत. परंतु काही कारणास्तव अनवधानाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेले आहे. सबब कारणे सदरचे अर्जदार यांचा भाऊ **कै.नरेंद्र यज्ञेश्वर पाटील** यांच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश निर्गमित अधिकारी, पनवेल महानगरपालिका, नावडे विभाग, ता.पनवेल, जि.रायगड यांना देण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब सदर फौजदारी चौकशी अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद कायदा १९६९ कलम १३(३) प्रमाणे मृत्यूची नोंद करून मिळण्याकरिता अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर मृत्यूच्या नोंदीच्या अर्जाचा आदेश मिळण्याकामी कोणाच्याही, कसल्याही व कोणत्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांच्या लाभांत मृत्यूच्या नोंदीचा आदेश दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१९/०४/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याने नोटीस दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

# वर्षातील पहिल्या अंगारक संकष्टी चतुर्थीला अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत भक्तीमेळा फुलला

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोरोनाची लाट ओसरल्यानंतर पुन्हा एकदा जनजीवन पूर्वपदावर आलेय. राज्य शासनाने शासन निर्बंध शिथिल केले. धार्मिक स्थळे व मंदिरे दर्शनासाठी खुली केली. अशातच महाराष्ट्रातील अष्टविनायक तीर्थ क्षेत्रापैकी आयएसओ मानांकन प्राप्त प्रख्यात धार्मिक स्थळ असलेल्या पाली शहरात या वर्षातील पहिल्या अंगारक संकष्टी चतुर्थीला मंगळवारी (ता.१९) बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी हजारो भाविक पहाटेपासून दाखल झाले होते. सकाळपासून दर्शनासाठी भाविकांच्या लांब रांगा लागल्या होत्या. मंदिर परिसराला जणूकाही यात्रेचे स्वरूप आले होते. हे बाप्पा बल्लाळेश्वरा सर्वांना सुखी ठेव, कोरोनाला दूर ठेव..अशी आर्त विनवणी भाविक भक्तगणांनी गणरायाला केली असल्याचे अनेक भाविकांनी यावेळी बोलताना सांगितले. रायगड जिल्ह्यासह मुंबई, नविमुंबई, उपनगर, ठाणे, पुणे , कोकण पट्ट्यातून भाविक भक्तगण आपल्या लाडक्या बाप्पा गणरायाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी मोठ्या भक्तिभावाने दाखल झाल्याचे पहावयास मिळाले. उन्हाळी सुट्या तसेच सलग लागून आलेल्या सुट्ट्या यामुळे गणेशभक्तांनी



अष्टविनायक दर्शनाचा बेत आखला. त्यामुळे पालीत अंगारकीला भक्तांचा मळा फुलून निघाला. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना उत्तम प्रकारच्या सोयीसुविधा पुरविण्यासाठी बल्लाळेश्वर देवस्थानने नीटनेटके नियोजन केले होते. याठिकाणी विविध प्रकारची दुकाने देखील सजली होती. शिवाय मंदिर परिसरात रानमेवा विक्रीसाठी बसलेल्या आदिवासी बांधवांचा देखील धंदा तेजीत होता. कोरोनानंतर दोन पैसे हाती आल्याने आदिवासी बांधव देखील समाधानी झाल्याचे पहावयास मिळाले.

आदल्या दिवशी मंदिराला विद्युत रोषणाई करण्यात आली होती. दर्शनासाठी रायगड जिल्हा, महाराष्ट्रातील विविध भागांसह मुंबई, ठाणे पुणे आदी शहरांतील आणि परराज्यातून भाविक व पर्यटक मोठ्या प्रमाणावर पालीत दाखल झाले होते. भाविक व स्थानिकांच्या वाहनांमुळे काही ठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती. मात्र वाहतूक पोलीस व देवस्थान ट्रस्टचे सुरक्षा रक्षक वाहतूक कोंडी सोडवीत होते. पाली पोलीस निरीक्षक विश्वजित काईनगडे यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिरात व मंदिर परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता, याबरोबरच पालीत येणारी वाहने व नागरिक यांच्यावर सुरक्षेच्या दृष्टीने सीसी टीव्ही कॅमेऱ्याची देखील नजर होती. यावेळी बल्लाळेश्वराचे दर्शन घेतल्यानंतर भाविकांच्या चेहऱ्यावर वेगळे तेज व समाधान पहावयास मिळत होते.

बल्लाळेश्वर मंदिर परिसरात गावठी भाज्या, फळे, काजूगर, कैरी, कोकम, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक आदिवासी महिला विक्रेत्या बसल्या होत्या. देवळात येणारे भाविक आवर्जून ते खरेदी करत होते. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते.

परिसरातील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार , फुल व पापड मिरगुंड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले यांचा व्यवसाय चांगला झाला. मंदिर परिसरात मोठी वर्दळ पहायला मिळत होती. बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे, उपाध्यक्ष वैभव आपटे, विश्वस्त प्रमोद पावगी, अरुण गद्रे, विश्वास गद्रे, अमोल साठे आणि डॉ. पिनाकीन कुंटे यांच्या मार्फत भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

# लोकमान्य सोसायटीच्या निवडणुकीत उद्योजक राजू पिचिका यांच्या पॅनलचा दणदणीत विजय



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण शहरातील सर्वात जुनी व नावाजलेल्या लोकमान्य हौसिंग सोसायटीच्या निवडणुकीत उद्योजक राजू पिचिका यांच्या पॅनलने दणदणीत विजय संपादन केले आहे. नऊ उमेदवारांपैकी आठ उमेदवार भरघोस मतांनी विजयी झाले असून एक उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. सोसायटीच्या निवडणुकीत निर्विवाद वर्चस्व मिळाल्याबद्दल उद्योजक राजू पिचिका यांनी मतदारांचे जाहीर आभार मानले.

पेण येथील लोकमान्य हौसिंग सोसायटी १९६५ साली स्थापन झाली आहे. या सोसायटीत ७० प्लॉट धारक आहेत. चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत ७० मतदारांपैकी ४८ मतदारांनी आपल्या मतदानाचे हक्क बजावले. उद्योजक राजू पिचिका यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली स्वतः राजू पिचिका यांना ३६ मते, उल्हास वाड यांना ३२ मते, स्मिता वैशंपायन यांना २९ मते , महेंद्र मोहिते यांना ३७ मते, सतीश म्हात्रे यांना ३५ मते, प्रज्ञा जोशी यांना ३२ मते, सीताराम धाऊ पाटील यांना ३३ मते व हरेश शहा यांना ३० मते मिळाली. राजेश म्हात्रे यांच्या समोरील उमेदवाराने अर्ज मागे घेतल्याने पाटील हे उमेदवार ओबीसी गटातून बिनविरोध निवडून आले होते. तर प्रतिस्पर्धी गटातील प्रकाश वखरे, करुणा पाटील, सुजाता पाटील या तीन उमेदवारांचा पराभव झाला. या निवडणुकीत राजू पिचिका गटाचे एकूण नऊ पैकी नऊ उमेदवार निवडून आले आहेत. अरुण चौधरी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.

यावेळी बोलताना उद्योजक राजू पिचिका यांनी सांगितले की, यापुढेही सोसायटीच्या विकास कामात आम्ही कुठेही कमी पडणार नाहीत. आणि सोसायटीच्या विकास कामात कोणतेही राजकारण न आणता आम्ही सर्वांची कामे करणार आहोत. तसेच सर्व मतदार यांनी आमच्यावर विश्वास ठेवून आमच्या पॅनलला निवडून दिल्या बद्दल राजू पिचिका यांनी सर्वांचे आभार मानले.

# खराब झालेले विद्युत मीटर त्वरित बदलून देण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खराब झालेले विद्युत मीटर त्वरित बदलून देण्याची शिवसेनेची मागणी कामोठे शिवसेनेच्या वतीने वीज वितरण कंपनी च्या अधिकाऱ्यांकडे करण्यात आली.



कामोठे शिवसेना शहर प्रमुख राकेश गोवारी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभाग प्रमुख सचिन त्रिमुखे, संजय जंगम यांनी संबधीत अधिकारांची भेट घेऊन सिडको अधिकारामध्ये असलेल्या कामोठे शहरात कार्यकारी अभियंता सिडको कामोठे या विभागात मीटर साठा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकाना मीटर बाहेरून जास्त किमतीत विकत घ्यावे लागत आहे. कारण मीटर उपलब्ध करण्याची जवाबदारी त्यांची आहे. ग्राहक त्यांना बिल आणि सर्विस चार्जेस देत असतानाही रहिवाश्यानी मीटर बाहेरून का विकत घ्यावे.त्यामुळे लवकरात लवकर मीटर कार्यकारी अभियंता सिडको विभाग इथे उपलब्ध करून द्यावे अशी मागणी अतिरिक्त कार्यकारी अभियंता सिडको विभाग करण्यात आली.

# मजगांव प्राथमिक शाळेत शाळा पुर्वतयारी मेळावा उत्साहात

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगड जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पनवेल व मुरुड तालुका पंचायत समितीच्या शिक्षण विभागातर्फे मजगांव येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शाळा प्रवेश पुर्व तयारी मेळावा उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी शाळेत दाखल पात्र सर्व विद्यार्थी व त्यांचे पालकही उपस्थित होते.

सर्व प्रथम प्रभात फेरी चे आयोजन करण्यात आले होते त्या नंतर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निखिल मानाजी यांचे हस्ते फीत कापून व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात प्रभारी मुख्याध्यापक व श्रीमती पल्लवी भोईर उपशिक्षिका व अध्यक्ष यांनी मार्गदर्शन केले.

मजगांव प्राथमिक शाळेला सेमी इंग्लिश साठी शासनाकडून मान्यता मिळाली असून शाळा आय.एस.ओ.मानांकन होण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष निखिल मानाजी यांनी सांगितले तसेच शाळेत प्रॉजेक्टर, कॉम्प्युटर व अन्य शैक्षणिक साहित्य विषयक मार्गदर्शनपर माहिती दिली.

त्या नंतर नाव नोंदणी व इतर स्टॉलला उपस्थित पाहुणे व विद्यार्थी व पालक यांनी भेट दिली शाळा व्यवस्थापन समिती सदस्य उमेश कोंडाजी, योगेंद्र गोयजी, सरीता धसाडे, पाकेताई व सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेतला सर्व शिक्षिका व अंगणवाडी सेविका यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, **मौजे : पाले बुद्रुक, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड** येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत / जमीन ही आमचे अशिल **भगवान विश्वनाथ लोखंडे,** रा.वलप, पो.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०८ यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पाले बुद्रुक, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गांव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| पाले बुद्रुक | हरिश्चंद्र काना म्हात्रे लिलाबाई काना म्हात्रे | ५२/९ | ०-०१-००<br>पोटखराबा ०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-०१-०० | ०.०३ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी

ठिकाण : पनवेल
दिनांक : १९/०४/२०२२

**सही/-**
**ॲड.महेश भगत**
**शॉप नं.२२, कल्पतरु कॉम्प्लेक्स,**
**प्लॉट नं.५१, सेक्टर नं.९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल-पश्चिम,**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**मोबा नं.८४२५०४००९३**

मा.गोडसे सो

प्रोसेस जमा रु.५०/- — **अर्जारातर्फे वकील : ॲड.अविनाश भोईर**
**ॲड.प्रसाद वाकडीकर**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) साहेब यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.५४१/२०२२
नि.क्र.८/ड
ने.ता.१७/०६/२०२२

**कै.सिताराम सखाराम भोईर (मयत)**
**१) श्रीमती.लक्ष्मीबाई सिताराम भोईर**
वय : ७१ वर्षे, धंदा : गृहिणी
**२) श्री.नंदकुमार सिताराम भोईर**
वय : ५७ वर्षे, धंदा : शेती
**३) श्री.सतीश सिताराम भोईर**
वय : ५० वर्षे, धंदा : शेती
**४) श्री.जीवन सिताराम भोईर**
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
**५) श्री.अच्युत सिताराम भोईर**
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
वरील क्र.१ ते ५ रा.मु.पेंधर,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
**६) सौ.प्रेमा चांगदेव पाटील**
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.उत्तरशिव, तालुका : ठाणे, जिल्हा : ठाणे
**७) सौ.ज्योती नंदकुमार गायकवाड**
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.वरचे ओवळे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की, ज्याअर्थी **कै.सिताराम सखाराम भोईर (मयत)** यांचे **दि.०७/०८/२०१७** रोजी एमजीएम न्यू बॉम्बे हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई येथे निधन झाले.

**कै.सिताराम सखाराम भोईर (मयत)** यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या वडिलोपार्जित वारसाहक्कातील व स्वकष्टार्जित मालकीच्या अशा खालील मिळकती होत्या :-

**मिळकतींचे वर्णन**

| अ.क्र. | गाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पेंधर २९७ | १५२ | १ | ०-९७-९ | ५.६९ |

मयत **कै.सिताराम सखाराम भोईर** यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यंनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मे.न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत **कै. सिताराम सखाराम भोईर (मयत)** यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारसदाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दि.१९/०४/२०२२ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

सोनावणे साहेब

प्रोसेस जमा रु.५०/- — **अर्जदारतर्फे वकील**
सक्सेशन दाखला — **ॲड.शुभांगी केदार लाड**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.४६६/२०२२
नि.क्र.७/ड
ने.ता.०९/०६/२०२२

**कै.जगदीश नगनलाल बोहरा (मयत) यांचे वारस**
**१) श्रीमती.ब्रिजकला जगदीश बोहरा**
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.१७१, एम.जी.रोड, बांठीया बि,
ओल्ड पनवेल, रायगड महाराष्ट्र-४१०२०६
**२) पुर्णिमा जगदीश बोहरा लग्नानंतर**
**पुर्णिमा जयप्रकाश बोहरा**
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.८-३-७८, ओल्ड बिट बाझार, वारणगल, आंध्रप्रदेश, ५०६००२
**३) शीला जगदीश बोहरा लग्नानंतर**
**शीला कृष्णकुमार नंदवाना**
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नंदवाना कॉलनी, निमोदा हरिजी,
निमोदा, कोटा-राजस्थान ३२५२०१
**४) श्रद्धा जगदीश बोहरा लग्नानंतर**
**श्रद्धा प्रितेश बोहरा**
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.१, सिद्धार्थ अपार्टमेंट, नंददीप सोसायटी,
जी.पी.नगर रोड, नंददीप शाळेजवळ, मुंबई,
गोरेगाव (इस्ट) महाराष्ट्र ४०००६३ — अर्जदार

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, **कै.जगदीश नगनलाल बोहरा** यांचा मृत्यू **दि.१२/११/१९९६** रोजी सुश्रुषा हॉस्पिटल, दादर येथे झालेला आहे. **कै.जगदीश नगनलाल बोहरा** यांचे नावावर खालील तपशिलात नमूद केल्याप्रमाणे **''द टाटा पॉवर कंपनी लिमिटेड आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड''** यांचे शेअर्स आहेत आणि **युनियन बँक ऑफ इंडिया** या बँकेचे खाते आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**अ) द टाटा पॉवर कंपनी लिमिटेड आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड**

| Folio No. | Company Name | Certificate No. | Distincitve Number (s) | Quantity |
|---|---|---|---|---|
| 059364251 | Reliance Industries Limited | 62461422 | 002207641959-002207642258 | 300 |
| H5J0010246 | The Tata Power Company Limited | R-00157399 | 0006514613 To 0006514617 | 5 |
| H5J0010246 | The Tata Power Company Limited | R-00157400 | 0006514618 To 0006514622 | 5 |
| H5J0010246 | The Tata Power Company Limited | R-00157401 | 0006514623 To 0006514627 | 5 |
| H5J0010246 | The Tata Power Company Limited | R-00157402 | 0006514628 To 0006514632 | 5 |
| H5J0010246 | The Tata Power Company Limited | R-00157403 | 0006514633 To 0006514634 | 2 |
| | | | Total Shares | 322 |

**ब) बँकेचे वर्णन**

| बँकेचे नाव | शाखा | अकाऊंट नंबर | शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|
| युनियन बँक | पनवेल | ३४४८०२०१०००८२६५ | ६८,५११.३० |

वरील शेअर्सच्या संदर्भात अर्जदार यांनी वारस / सक्सेशन दाखला मिळणेकरिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस / सक्सेशन दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस / सक्सेशन दाखला प्रदान करण्यात येईल. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.१९/०४/२०२२ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## जय हनुमान मित्र मंडळ गोवे आयोजित कबड्डी स्पर्धेत स्वयंभू वरसगांव संघ अंतिम विजेता

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील मौजे गोवे येथील निसर्ग रम्य परिसरात व विद्युत प्रकाशाच्या रोषणाईत खेळविण्यात आलेल्या कबड्डी स्पर्धेत स्वयंभु वरसगांव व जय बजीरंग आंबेवाडी यांच्या झालेल्या अटीततीच्या व शेवट पर्यंत रंगतदार ठरलेल्या सामन्यात अखेरच्या क्षणी स्वयंभु वरसगांव संघाने जय बजीरंग आंबेवाडी संघाचा पराभव करुन विजेते पद पटकावले. तर आंबेवाडी संघाला उपविजेता पदावर समाधान मानावे लागले.

जय हनुमान मित्रमंडळ गोवे यांच्या तर्फे व कोलाड विभागीय असोसिएशनच्या मान्यतेने गोवे येथे कबड्डी स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेचे उद्धघाटन गोवे ग्रामपंचायत आदर्श सरपंच महेंद्र पोटफोडे, खांब विभागीय अध्यक्ष नरेंद्र जाधव, माजी सरपंच सुप्रिया जाधव, माजी उपसरपंच नितीन जाधव,संदीप जाधव, युवानेते राकेश कापसे, राजेंद्र जाधव, नितीन जवके, महाडिक सर,कोलाड विभाग असोसिएशनचे अध्यक्ष गणेश सानप यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी गोवे गावाकमेटी अध्यक्ष नामदेव जाधव, सचिव श्रीधर गुजर, खजिनदार कमलाकर शिर्के, पोलीस पाटील सुरेश जाधव, तंटामुक्ती अध्यक्ष शांताराम पवार,माजी अध्यक्ष राजेश शिर्के, माजी सचिव लीलाधर दहिंबेकर, गोवे खांब क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र जाधव, सचिव शरद वारकर, भरत जाधव, नितीन वारकर, बळीराम जाधव, शंकर दहिंबेकर, शांताराम घरट, बाळाराम जाधव, रामचंद्र कापसे, मनोहर मांजरे, स्वप्नील सानप, महेंद्र जाधव, रामा गुजर, सुरेश जाधव, नंदा जाधव, महादेव जाधव, बाबु पवार, दिनकर दहिंबेकर, नंदा वाफिळकर, गोविंद गायकवाड, गोवे कब्बडीचे प्रशिक्षक मधुकर धामणसे, रविंद्र जाधव, अरविंद पवार, श्रीराम मंचेकर,विजय जवके व रोहा तालुक्यातील असंख्य कबड्डी प्रेमी उपस्थित होते. तर स्पर्धेत पालेखुर्द ब संघ तृतीय तर वीर हनुमान संभे संघ चतुर्थ क्रमांकाचे मानकरी संघ ठरला, तर मालिका वीर वरसगांव संघाचा राज आंब्रुस्कर, उत्कृष्ट चढाई आंबेवाडी संघाचा अकीलेश घाडगे, उत्कृष्ट पक्कड वरसगांव संघाचा सौरभ पोटफोडे, तर पब्लिक हिरो संभे संघाचा प्रसन्न सकपाळ ठरला, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजदीप जाधव व पांडुरंग जाधव यांनी केले.कबड्डी स्पर्धा यशस्विकरण्यासाठी जय हनुमान मित्र मंडळाचे पदाधिकारी, सर्व सदस्य, समस्त ग्रामस्थ मंडळ गोवे यांनी मेहनत घेतली.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्यासाठी विभागीय नोंदणी करण्याची किसान सभेची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण, पनवेल व नवीमुंबईतील प्रकल्पग्रस्तांची गावठाणा बाहेरील घरे नियमित करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून या संदर्भात सिडकोकडून प्रकल्पग्रस्तांच्या घरांची माहिती संकलित करण्याच्या कामासाठी रायगड भवन येथे एक नवीन विभाग सुरु करण्यात आला आहे. मात्र अशा लवकरच ८५ गावातील माहिती व कागदपत्रे गोळा करण्यासाठी एका केंद्रा ऐवजी उरण,पनवेल व नवीमुंबई असे तीन विभाग करून प्रकल्पग्रस्तांच्या घरांची माहिती संकलित करण्यात यावी अशी मागणी किसानसभेच्या वतीने करण्यात आली आहे.

राज्य सरकारने ३० ते ३५ वर्षा पासून प्रलंबित असलेल्या सिडको संपादीत भूखंडावरील प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याची मागणी केली जात होती. त्यानुसार २०२२ पर्यंतची प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याचा निर्णय नगरविकास मंत्रालयाने घेतला आहे. मात्र या शासनाच्या निर्णयावर प्रकल्पग्रस्तांचे आक्षेप आहेत. त्यानुसार निर्णयात सुधारणा करण्याची मागणी केली.

त्याशिवाय अंमलबजावणी करू नये अशीही भूमिका प्रकल्पग्रस्तांच्या अनेक संघटनानी घेतली आहे. या मागणीसाठी शासनाशी पत्रव्यवहार ही सुरू आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्यासाठी आकारण्यात येत असलेल्या किंमतीला आक्षेप आहे. तसेच हे भूखंड प्रकल्पग्रस्तांना भाडेपट्टीवर न देता मालकी हक्काने देण्याचीही मागणी करण्यात आली आहे. असे असतांना शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी सिडकोने सुरुवात केली आहे.यात प्रकल्पग्रस्तांना आवश्यकता असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करण्याचे आवाहन सिडको कडून करण्यात आले आहे. मात्र प्रकल्पग्रस्तांकडून मागण्यात आलेली कागदपत्रे ही उरण,पनवेल व नवीमुंबई आशा तीन विभागातुन जमा करण्याची व्यवस्था करावी अशी मागणी रायगड जिल्हा किसान सभेच्या वतीने करण्यात आली आहे.

## कोरोना काळात डॉक्टरांनी केलेले काम देवदूत सारखेच : आ.रविशेठ पाटील



**दै.रायगड नगरी । पेण**

देशामध्ये मागच्या दोन वर्षात आलेल्या कोरोनामुळे अनेकांना आपले जीव गमवावे लागले. मात्र या कठीण परिस्थितीत सुद्धा आपल्या जीवाची पर्वा न करता इतरांसाठी अहोरात्र झटणाऱ्या डॉक्टरांचे काम देवदुत सारखेच असल्याचे प्रतिपादन पेणचे भाजप आमदार रविशेठ पाटील यांनी केले. केंद्र व राज्य शासनाच्या सूचने नुसार एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत आयुष्यमान आरोग्य मेळाव्याचा शुभारंभ पेण उपजिल्हा रुग्णालयात येथे आ.रविशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी रायगड जिल्हा आरोग्य अधिकारी सुधाकर मोरे, तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.राजीव तांबाळे, तालुका आरोग्य अधिकारी अपर्णा खेडेकर, डॉ.वंदनकुमार पाटील, डॉ.अफजलपुरकर, डॉ. वैभव ठाकूर, डॉ.अभिजीत पाटील आदींसह रुग्णालयातील कर्मचारी, आशा वर्कर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना रविशेठ पाटील म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व नागरिकांना मोफत लस वाटप केल्यामुळे येणारा कोरोनाचा चौथा टप्पा आपण रोखू शकलो. आरोग्य विभागासाठी शासनाच्या अनेक योजना येत आहेत. त्या योग्य रीतीने राबविल्यास रुग्णांची संख्या कमी प्रमाणात होणार आहे. उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. राजीव तांबाळे यांनी अतिशय चांगल्या प्रकारे काम केल्याने त्यांचे या ठिकाणी कौतुक करण्यात आले. तर आरोग्य विभागाच्या दृष्टीने काम करत असताना सर्व स्तरावरून चांगला प्रतिसाद मिळाला असून कोरोना काळात सर्व प्रशासकीय अधिकारी कर्मचारी यांनी जबाबदारीने काम केले असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी सुधाकर मोरे यांनी सांगितले. या मेळाव्यात उच्च रक्तदाब व मधुमेह १५२, नेत्ररोग १९२, स्त्रियांचे आजार ६९, रक्त व लघवी तपासणी १३९, फिजिशियन ३७०, लहान मुलांचे १७, दंत चिकित्सा १०, नाक कान घसा ३५, अस्थिरोग २५ असे एकूण तालुक्यातील ६९२ रुग्णांनी लाभ घेतला.

## तळा शहरात सर्व रोग निदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद ; १०१९ जणांनी घेतला लाभ

**दै.रायगड नगरी । तळा**

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तालुका आरोग्य अधिकारी तळा आयोजित प्राथमिक आरोग्य केंद्र/गो म.वेदक विद्यामंदिर तळा येथे सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन सोमवार १८ एप्रिल २२ रोजी सकाळी ९ ते दु.३वा. पर्यंत घेण्यात आले या शिबिराचे उद्घाटन आमदार मा.अनिकेत तटकरे विधान परिषद कोकण विभाग यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी तळा तहसीलदार अण्णाप्पा कनशेट्टी, तळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ अस्मिता भोरावकर, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, नगर-सेवक व नगरसेविका, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. विनोद गोरेगावकर, प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व डॉक्टर, नर्स, आरोग्य सेविका, बीडीओ विजय यादव आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरात स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, नेत्ररोग, कान, नाक, घसा, दंतचिकित्सक, भीषक आदी आजारांची मोफत तपासणी करण्यात आली असून १०१९ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. याप्रसंगी तळे प्राथमिक आरोग्य केंद्र मांदाड, प्राथमिक आरोग्य केंद्र महागाव, प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, मदतनीस यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. विविध आजारावर एमजीएम हॉस्पिटल डॉक्टर्स फाऊंडेशनचे डॉक्टर व तळा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ गजेंद्र मोघे, डॉ संदीप सांगडे, डॉ अमोल देशमुख, तेजस बाबर, डॉ स्मिता पाटील, डॉ प्राची घोसाळकर, डॉ सुरेश कुलकर्णी, डॉ संकेत थळी, आरोग्य सेविका तनुजा मुळे, आरोग्य सहाय्यक श्री नांदगावकर, श्री कदम यांनी सहकार्य केले. तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस नाना भौड, माजी उपसभापती गणेश वाघमारे, ज्येष्ठ नेते ड. उत्तम जाधव, नगरसेवक मंगेश शिगवण, नगरसेवक प्रकाश गायकवाड, नगरसेविका पुष्पा नागे, नगरसेविका माधुरी घोलप, गिरणेचे सरपंच ज्योती पायगुडे, चंद्रकांत बोरकर, महागावचे माजी सरपंच विठोबा साबळे, मांदाडचे सरपंच तानाजी कालप, विजय तांबे, कृष्णा चाळके, सचिन कदम, किशोर शिंदे, महेंद्र कजबजे, कैलास पायगुडे, यांचेसह तालुक्यातील नागरिक व रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्र सरकारच्या सुचनेनुसार आझादी कि अमृत महोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात घेण्यात आला असून तळा तालुक्यातील अनेक लोकांनी लाभ घेतला. रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्याच्या दृष्टीने तळा तालुका आरोग्य अधिकारी, एम् जी एम हॉस्पिटल कंळबोली,/कामोठे,स्वदेश फाऊंडेशन लोणेरे माणगांव प्राथमिक आरोग्य केंद्र तळा यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले होते. जवळपास११०० लोकांनी शारीरिक तपासणी करून आजारावर, रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी निश्चितच शिबिरातून लाभ मिळाला आहे. सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी तालुका आरोग्य कार्यालय कर्मचारी, तळा प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचारी आशा सेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामसेवक यांनी मेहनत घेतली.





## कर्जतमध्ये सुरेश भाऊ लाड चषक क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मध्ये सुरेश भाऊ लाड चषक भव्य ओव्हर आर्म नाईट टेनिस क्रिकेट स्पर्धेचे शानदार उदघाटन संपन्न झाले, या स्पर्धा १८ व १९ एप्रिल रोजी खेळल्या जाणार आहेत.

ग्रीन व्ह्यू हॉटेलच्या मागे भिसेगाव मैदानावर नाईट टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुळकर्णी व नगरसेवक सोमनाथ ठोंबरे यांनी केले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेचे उद्घाटन काल दि. १८ एप्रिल रोजी रात्री नऊ वाजता राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तानाजी चव्हाण, तालुकाध्यक्ष भगवान चंचे, नगरसेवक शरद लाड, माजी नगराध्यक्ष राजेश लाड यांच्या हस्ते संपन्न झाले याप्रसंगी अतुल चंचे, सीताराम लदगे, रमेश लदगे,नथुराम लदगे, स्वप्नील जाधव, भिसेगावचे पोलीस पाटील संजय हजारे आदी उपस्थित होते. पहिल्या क्रमांक-१ लाख,दुसरा क्रमांक -७५ हजार, तिसरा क्रमांक-५० हजार, चौथा क्रमांक-३५ हजार पाचवा क्रमांक-२५ हजार, सहावा क्रमांक-२५ हजार व आकर्षक चषक तसेच मालिकवीर साठी सायकल, उत्कृष्ट फलंदाज- कुलर, उत्कृष्ट गोलंदाज-कुलर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक-शूज आणि सामनावीर -आकर्षक चषक अशी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. या स्पर्धेच्या नियोजनासाठी साईनाथ बोराडे, संदीप बोराडे, सलमान शेख, आकाश लाड, सिद्धेश खराडे, गणेश गोसावी उपस्थित होते.

## उरण एसटी कर्मचारी कामावर हजर झाल्याने बससेवा पूर्ववत

**दै.रायगड नगरी । उरण**

मुंबई विभागाच्या उरण एसटीआगारात संपकरी कामगारांचे पुनरागमण झाले असून २३० कर्मचाऱ्यांपैकी जवळजवळ २०० कर्मचारी कामावर रुजू झाले असून ५० टक्क्यां अधिक बस सेवा सुरू झाली असल्याची माहिती उरण एस टी आगाराचे मॅनेजर सचिन मालशे यांनी दिली आहे.

जवळजवळ ऑक्टोबर महिन्यापासून राज्यातील एसटी कर्मचारी संपावर गेले होते. सहा महिने सुरू असलेल्या संपामधील उरण एस टी आगारातील जवळ जवळ २०० कर्मचारी परतले आहेत.जे कर्मचारी परतले आहेत त्यामधील सर्व कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. तसेच वाहकांना पुन्हा प्रशिक्षण देण्यास सुरवात केली आहे.

या आगोदर उरण एस टी वाहतूक ही सेवा पाच टक्के सुरू करण्यात आली होती परंतु आता कामगार कामावर रुजू झाल्याने ५० टक्क्यांपर्यंत गेली आहे.

## पोलादपूर स्थानकात झोपलेल्या आईच्या कुशीतून बाळाची अज्ञात व्यक्तीकडून चोरी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एस.टी.बस स्थानकात झोपलेल्या महिलेच्या कुशीतून तिच्या बाळाची चोरी अज्ञात व्यक्तीने केल्याने पोलादपूर तालुक्यात खळबळ उडाली आहे. पोलादपूर पोलीसांनी अज्ञात इसमाविरूध्द अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या पोलादपूर एस.टी.बस स्थानकामध्ये सडवली आदिवासीवाडीतील सुमन वसंत कोळी (वय ३० वर्षे)ही भंगारगोळा करून उदरनिर्वाह करणारी महिला युवराज वसंत कोळी या आठ महिने वयाच्या बाळासह झोपली असता अज्ञात इसमाने तिचे बाळ तिच्या परवानगीशिवाय पळविल्याची घटना रविवार, दि. १७ एप्रिल २०२२ रोजी रात्री बारा वाजण्यापूर्वी घडली.

या घटनेची फिर्याद आई सुमन कोळी हिने सोमवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास केली. याप्रकरणी अंगात हिरव्या रंगाचा टीशर्ट, कमरेला सप्तरंगी दोरा आणि उंची दीड फूट, वर्ण गोरा अशा वर्णनाचा युवराज वसंत कोळी या मुलाचे अपहरण केल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरूध्द भादंवि ३६३ कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोल-ादपूर पोलीस ठाण्याचे हवालदार संदीप शिरगांवकर हे सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.


दिनांक : १९/०४/२०२२

### जाहीर सूचना

श्री सागर अग्रवाल, पत्ता : १२०४, दि अफेअर्स, प्लॉट नं-९, सेक्टर-१७, सानपाडा, नवी मुंबई तमाम जनतेच्या माहितीसाठी खालीलप्रमाणे जाहीर सुचना देत आहेत.

आमचे नावे, ताबे-कब्जातील मौजे आकुर्ली, ता. पनवेल, जि.रायगड येथे महसुल अभिलेखामध्ये वर्णन केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे नमुद केल्याप्रमाणे बिनशेती जमीन मिळकत आहे.

| अ.क्र. | सर्वे नं./ गट नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १ | ९अ /१० | ३०६० चौ.मी. |

सक्षम अधिकारी म्हणजेच असोशिएट प्लानर (नैना) सिडको/नैना/पनवेल/आकुर्ली/बीपी-०३९७/एसीसी/२०२२/०१८५ दि.३१/०३/२०२२ व्दारे परवानगी दिलेली आहे आणि सदर सक्षम नगर रचना नियोजन अधिकारी म्हणजेच असोशिएट प्लानर (नैना) सिडको यांनी त्यांचे पत्र क्र. सिडको/नैना/पनवेल/आकुर्ली/बीपी-०३९७/एसीसी/२०२२/०१८५ दि.३१/०३/२०२२ व्दारे कमेंन्समेंट सर्टिफिकेट माहिती जनतेच्या माहितीसाठी प्रकाशित करत आहोत.

| | |
|---|---|
| मालक/विकासकाचे नांव आणि पत्ता | श्री सागर अग्रवाल, १२०४, दि अफेअर्स, प्लॉट नं-९, सेक्टर-१७, सानपाडा, नवी मुंबई |
| कंत्राटदाराचे नाव आणि पत्ता<br>मिळकतीचे वर्णन | कॉन्ट्रक्स,<br>१३०२, हायटेक सीएचएस, प्लॉट नं -११, सेक्टर-३८, सीवुडस्, नवी मुंबई. |
| विकसनाची परवानगी मंजूर झाल्याचे आदेश क्र. आणि दिनांक | सिडको/नैना/पनवेल/आकुर्ली/बीपी-०३९७/एसीसी/२०२२/०१८५ दि.३१/०३/२०२२ |
| कमेंन्समेंट सर्टीफिकेटचे आदेश क्र. आणि दि. | सिडको/नैना/पनवेल/आकुर्ली/बीपी-०३९७/एसीसी/२०२२/०१८५ दि.३१/०३/२०२२ |
| मंजूर फ्लोअर स्पेस इंडेक्स (एफ.एस.आय.) | मंजूर एफ.एस.आय.१ (एक) |
| एकूण सदनिका आणि त्यांचे एकूण मंजूर क्षेत्र | एकुण ८४ सदनिका ज्या दोन तळमजला अधिक ४ मजल्याच्या इमारतीमध्ये बांधण्याची परवानगी मिळालेली आहे ज्याचा संपूर्ण बांधीव क्षेत्र ३०५६.४१ चौ.मी. |
| मंजूर नकाशे आणि इतर संबंधित कागदपत्रांच्या प्रति संबंधित कागदपत्रांच्या प्रति तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या जागेचा पत्ता | सागर अग्रवाल, गट नं- ९अ /१०, मौजे.आकुर्ली, ता-पनवेल, जि-रायगड |
| आर्किटेक्टचे नाव | ए.एन. आर्च, आर्किटेक्ट-नेहा जैन |
| स्ट्रक्चरल इंजिनिअरचे नाव | आधारशिला कन्सलटंन्ट-समर्थ अग्रवाल |


## आपटवणे गावच्या हद्दीत ओव्हळात औषध गोळ्यांच्या हजारो पाकिटांचा खच ; ग्रामस्थ संतप्त

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील आपटवणे गावच्या हद्दीत असलेल्या ओव्हळात औषध गोळ्यांच्या हजारो पाकिटांचा खच टाकण्यात आला आहे. मंगळवारी (ता.१९) येथील सरपंच शरद चोरघे आणि ग्रामस्थांनी ही बाब निदर्शनास आणली आहे. या प्रकारामुळे ग्रामस्थ संतप्त झाले आहेत.

ग्रामीण भागात रुग्णांवर उपचारासाठी सरकार मार्फत शासकीय रुग्णालयांना पुरविण्यात आलेल्या कॅल्शियम व गर्भनिरोधक गोळ्यांची ही पाकिटे आहेत. आणि ही हजारो पाकिटे त्यांची योग्य विल्हेवाट न लावता अशा प्रकारे निष्काळजीपणे फेकून दिलेली आहेत.

लहान मुले व जनावरे यांनी हे औषधे खाल्ल्यास त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. शिवाय येथील पर्यावरणाला देखील हानी पोहचू शकते. मागील वर्षी अशाच प्रकारे गाठेमाळ आदिवासी वाडीजवळ मुदत न संपलेल्या आयरन अँड फॉलिक ॲसिड सिरप च्या बाटल्या फेकण्यात आल्या होत्या.


दिनांक : १९/०४/२०२२

### जाहीर सूचना

मे.जिंदाल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, पत्ता : १२०४, दि अफेअर्स, प्लॉट नं.९, सेक्टर-१७, सानपाडा, नवीमुंबई तमाम जनतेच्या माहितीसाठी खालीलप्रमाणे जाहीर सुचना देत आहेत.

आमचे नावे, ताबे-कब्जातील मौजे : केवाळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे महसूल अभिलेखामध्ये वर्णन केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे नमूद केल्याप्रमाणे बिनशेती जमीन मिळकत आहे.

| अ.क्र. | सर्वे नं./ गट नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १ | ७२/१/ब | १0000.00 चौ.मी. |

सक्षम अधिकारी म्हणजेच असोशिएट प्लानर (नैना) सिडको/नैना/पनवेल/केवाळे/बीपी-००५३४/सीसी/२०२२/०१६१ दि.२१/०२/२०२२ द्वारे परवानगी दिलेली आहे आणि सदर सक्षम नगर रचना नियोजन अधिकारी म्हणजेच असोशिएट प्लानर (नैना) सिडको यांनी त्यांचे पत्र क्र.सिडको/नैना/पनवेल/केवाळे/बीपी-००५३४/सीसी/२०२२/०१६१ दि.२१/०२/२०२२ द्वारे कमेंन्समेंट सर्टीफिकेट माहिती जनतेच्या माहितीसाठी प्रकाशित करत आहोत.

| | |
|---|---|
| मालक/विकासकाचे नांव आणि पत्ता | मे.जिंदाल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, १२०४, दि अफेअर्स, प्लॉट नं.९, सेक्टर-१७, सानपाडा, नवी मुंबई |
| कंत्राटदाराचे नाव आणि पत्ता<br>मिळकतीचे वर्णन | टेक्नो कास्ट इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स<br>ऑफिस नं.९०५, मयुरेश चेंबर्स, प्लॉट नं.६०, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर-४००६१४ |
| विकसनाची परवानगी मंजूर झाल्याचे आदेश क्र. आणि दिनांक | सिडको/नैना/पनवेल/केवाळे/बीपी-००५३४/सीसी/२०२२/०१६१ दि.२१/०२/२०२२ |
| कमेंन्समेंट सर्टीफिकेटचे आदेश क्र. आणि दि. | सिडको/नैना/पनवेल/केवाळे/बीपी-००५३४/सीसी/२०२२/०१६१ दि.२१/०२/२०२२ |
| मंजूर फ्लोअर स्पेस इंडेक्स (एफ.एस.आय.) | मंजूर एफ.एस.आय.१ (एक) |
| एकूण सदनिका आणि त्यांचे एकूण मंजूर क्षेत्र | १) एकूण २६६ सदनिका ज्या तीन स्टील अधिक ७ मजल्याच्या इमारतीमध्ये बांधण्याची परवानगी मिळालेली आहे ज्याचा संपूर्ण बांधीव क्षेत्र ९७१८.६८ चौ.मी.<br>२) ४० ईडब्ल्यूएस सदनिका ज्या एक तळमजला अधिक ४ मजल्याच्या इमारतीमध्ये बांधण्याची परवानगी मिळालेली आहे ज्याचा संपूर्ण बांधीव क्षेत्र १९४६.७५ चौ.मी. |
| मंजूर नकाशे आणि इतर संबंधित कागदपत्रांच्या प्रति संबंधित कागदपत्रांच्या प्रति तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या जागेचा पत्ता | मे.जिंदाल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, गट नं.७२/१/ब, मौजे : केवाळे, ता.पनवेल, जि.रायगड |
| आर्किटेक्टचे नाव | अतुल पटेल आर्किटेक्ट |
| स्ट्रक्चरल इंजिनिअरचे नाव | आधारशिला कन्सलटंन्ट-समर्थ अग्रवाल |